सकाळ

# सोनई महाविद्यालयात दहीहंडी स्पर्धा उत्साहात

**नेवासे, ता. २४ :** कृष्णाष्टमी व गोपाळकालानिमित्त यशवंत सामाजिक प्रतिष्ठान व सोनई येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे सोनई महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी दहीहंडी स्पर्धा उत्साहात झाल्या.

दहीहंडी फोडण्यापूर्वी महाविद्यालय परिसरात श्रीकृष्ण प्रतिमेची रथातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. क्रीडा विभागाच्या विद्यार्थिनींनी दहीहंडी फोडली. या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शंकर लावरे यांच्या हस्ते झाले. उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर, डॉ. ज्ञानदेव झिने, कनिष्ठ विभागाचे प्राचार्य शशिकांत लिपाणे, डॉ. मच्छिंद्र वर्पे, डॉ. निवृत्ती मिसाळ, डॉ. संदीप खेडकर, अविनाश साळवे उपस्थित होते. या स्पर्धेत महाविद्यालयांतर्गत एकवीस विद्यार्थ्यांनी गोविंदा मंडळात सहभाग घेतला.

ज्योती डांगे, दीप्ती लांडे, भाग्यश्री दरंदले, मुस्कान अन्सारी यांच्या संघाने दहीहंडी फोडण्याचा मान पटकावला. उत्सव समितीचे प्रमुख प्रा. सुनील गर्जे यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. सुरेश जाधव, प्रा. पाटील तुवर, संकेत आव्हाड, आशुतोष जाधव, दत्ता काटमोरे, योगेश वैरागर, नीलेश दुशिंग, कन्हैया वाघ यांनी प्रयत्न केले.



**सोनई : श्रीकृष्ण मिरवणुकीत सहभागी झालेले विद्यार्थी-विद्यार्थिनी व गोविंदा.** **(छायाचित्र : सुनील गर्जे)**

**'सार्वजनिक उत्साहामुळे समाजात एकात्मता वाढीस लागते. सर्व धर्मातील सण-उत्सव उत्साहात साजरे होणे महत्त्वाचे आहे. सोनई महाविद्यालयात प्रथमच दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद मिळाला.**
**- डॉ. शंकर लावरे,** प्राचार्य, सोनई महाविद्यालय

Nagar, NagarNorth
25/08/2019 Page No. 4